# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३**

## आदिवासी विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २८**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: टी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ४६,८०,०००/-**<br>**श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (१) | ५१३७ | १० | सांगली जिल्ह्यातील जत नगर परिषद हद्दीमध्ये 300 घर कुलांपैकी मंगळवेढा रोड सर्व्हे नं. १९ व उमराणी रोड, मंगळवार पेठ येथील १९५ घरकुलांचे काम प्रगती पथावर असून दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यापर्यंत बांधकाम करण्यात येणे, जत तालुका हा दुष्काळी तालुका असल्याने पाणी टंचाईमुळे पाणी सुद्धा विकत घ्यावे लागत असणे, बांधकाम साहित्याचे वाढलेले बाजार मूल्य अपुऱ्या अनुदानावर घरकुल बांधकाम परवडत नसल्याने सुधारित दराने अनुदान मिळणे आवश्यक असणे, जेणेकरून पारधी समाजाचे उत्तम दर्जेदार टिकाऊ पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण होणे शक्य असणे, राज्यातील हा आदीवासी पारधी समाजाच्या घरकुलाचा सर्वात मोठा प्रोजेक्ट असून पारधी समाज उन्हाळ्यात पावसाळ्यात उघड्यावर राहत असून याचा लहान मुले, वृद्ध यांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होत असल्याने सुधारित दराने मान्यता दीर्घकाळ प्रलंबित असून त्वरित बांधकाम चालू होण्यासाठी सुधारित दराने अनुदान मिळण्याची आवश्यकता असताना याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत करावयाची उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**रूपये:- ५,८४,२५,६६,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२) | ५१३८ | १० | राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये शिकविण्याची गरज असणे, आदिवासी जिल्हयातील आदिवासी विद्यार्थ्यांना महाबळेश्वर, पाचगणी, अहमदनगर व अन्य ठिकाणच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेत असणे, त्यांच्यासमवेत भेदभाव निर्माण होत असणे, त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्याचे खच्चीकरण होत असणे, आदिवासी विद्याथ्यार्यंचा आत्मविश्वास वाढविण्याची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | गरज असणे, त्यांना सोयीसुविधा देणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक आदिवासी बांधवात व रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावययाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**रूपये:- ३,८५,२५,०३,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (३) | ५१२६ | १० | पालघर जिल्हयातील जव्हार आदिवासी भागात "वाडी मॉडेल" चे प्रायोगिक तत्त्वावर उपक्रम राबविण्याची गरज असणे, मॉडेलने आरौग्य सुरक्षा वाढूवन देण्याची आवश्यकता असणे, आदिवासीच्या उदरनिर्वाहाची समस्या सोडविणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक आदिवासी बांधवात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण**<br>**रूपये:- ७१,९३,१३,०४,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (४) | ५०७९ | १० | "ऑनलाइन नोंदणी केलेल्या 30000 शेतकऱ्यांपैकी पंधरा हजार शेतकऱ्यांचे धान्य पडून असताना राज्य सरकारने जव्हार, जिल्हा पालघर येथील भात खरेदी केंद्राला टाळे ठोकले असणे, परिणामी हजारो शेतकऱ्यांना फटका बसल्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांना नाईलाजाने आपले धान्य स्वस्तात व्यापाऱ्याला विकावे लागत असणे, यासंदर्भात आदिवासी विकास महामंडळाच्या मार्फत ऑनलाइन पद्धतीने धान्य विक्रीसाठी नोंदणी ची अट रद्द करण्याची होत असलेली मागणी यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |
| (५) | ५०८१ | १० | "सिकल सेल आणि ऍनिमिया यासारख्या दुर्धर व्याधीचे निर्मूलन सन 2047 पर्यंत करण्याची घोषणा केंद्रीय अर्थसंकल्पात केलेली असणे, तथापि यासंदर्भात राज्याच्या अर्थसंकल्पात सिकल सेलच्या निर्मूलनाच्या बाबतीत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नसणे, सिकल सेल चे निदान होण्यासाठी ज्या प्रगत चाचण्या कराव्या लागतात त्या सरकारी रुग्णालयांमध्ये होत नसल्यामुळे आदिवासी नागरिकांना दुर्गम भागातून 40 ते 50 किलोमीटर पायपीट करून जावे लागत असणे, एका पिढीतून पुढील पिढीमध्ये जाणाऱ्या सिकल सेल सारख्या रक्तव्याधीमध्ये लवकर निदान होणे अत्यंत आवश्यक असणे, देशातील सीगल सेलच्या एकूण रुग्ण संख्येपैकी 29.8% रुग्ण हे एकट्या महाराष्ट्र राज्यात असून त्यांची संख्या सुमारे एक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | लाख 69 हजार पेक्षा अधिक असल्यामुळे राज्य सरकारने आपल्या स्वतःच्या तरतुदी बरोबर केंद्र सरकारने दिलेली तरतूद योग्य प्रकारे विनियोग करण्याची आवश्यकता." |
| (६) | ५०८३ | १० | "एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी मोखाडा जिल्हा पालघर यांनी पंधरा दिवसातून एकदा गावाला भेट देणे आवश्यक असताना असे दिसून येत नसणे, विभागात 25 मदतनिसांची पदे रिक्त असून दोन सेविकांच्या जागा रिक्त असल्यामुळे कुपोषण निर्मूलनाकडे होत असलेले दुर्लक्ष, एकट्या मोखाडा तालुक्यात 115 बालके तीव्र कुपोषित आणि 26 बालके अतितीव्र कुपोषित आढळून आलेली असणे, नुकताच मोखाडा तालुक्यातील सावर्डे गावात दोन बालिकांचा कुपोषणाने अवघ्या दहा दिवसात मृत्यू झाल्याच्या घटना घडल्यानंतर देखील सदर रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात कोणतीही कार्यवाही विभागाकडून झालेली नसणे या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपायोजना." |
| (७) | ५०९० | १० | "राज्यातील सरकारी व अनुदानित आश्रम शाळांमध्ये गत पाच वर्षात 1126 आदिवासी बालकांचा मृत्यू झालेला असताना सरकार मात्र आश्रम शाळेत अधिकाऱ्यांच्या ताब्यात असलेल्या विद्यार्थ्यांचा मृत्यू हा आश्रम शाळातील मृत्यू म्हणून कबूल करीत असणे, तथापि उर्वरित 1000 विद्यार्थी आश्रम शाळा मधून अत्यवस्थ अवस्थेत घरी हलवल्यानंतर दगावलेले असणे, ही वस्तुस्थिती सरकारने मान्य करण्याची आवश्यकता, आश्रम शाळांच्या संदर्भात वेगवेगळया समित्यांच्या शिफारशी शासनाकडे प्रलंबित असून त्यांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, बालकांच्या मृत्यूच्या संदर्भात आश्रम शाळांच्या दुरुस्ती संदर्भातील अहवाल विचारात घेण्याची आवश्यकता, या आश्रम शाळांची परिस्थिती सुधारण्यासाठी आदिवासी विकास विभागाने अत्यंत गांभीर्यपूर्वक मिशन मोडमध्ये काम करण्याची आवश्यकता, अर्थसंकल्पातील सर्वाधिक निधी आश्रम शाळांवर खर्च होत असताना अशा प्रकारे विद्यार्थ्यांचे झालेले मृत्यू अत्यंत गांभीर्याने घेण्याची आवश्यकता, आश्रम शाळांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी त्यावर देखरेख करणारी यंत्रणा सक्षम करणे तेथे वैद्यकीय सुविधा आहाराचा दर्जा शिक्षणाची गुणवत्ता यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असून याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले असणे या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |
| (८) | ५०९७ | १० | "राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रम शाळांमध्ये मागील पाच वर्षात ११२६ आदिवासी विद्यार्थ्यांच्या झालेल्या मृत्यूची जबाबदारी एकीकडे राज्य शासन घेत नसताना, या मृत्यूंचे लेखापरीक्षण करण्याची इच्छाशक्ती दाखवीत नसणे, आश्रम शाळातील विद्यार्थ्यांचे मृत्यू का होतात याचे विश्लेषण करण्याची आवश्यकता, परंतु राज्य शासन या विद्यार्थ्यांच्या मृत्यूची जबाबदारी घेत नसणे, सदर विद्यार्थी आजारी अवस्थेत आपल्या घरी जाऊन मृत्युमुखी पडल्यानंतर त्याची जबाबदारी घेत नसने, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
| --- | --- | --- | --- |
| | | | आणि मृत्यूच्या कारणांमध्ये सरकार मुलांची झाडावरून पडून झालेला, पाण्यात पडून, साप चावून, विष प्राशन करून, गळफास लावून आत्महत्या केली अशा प्रकारची कारणे देत असणे, केवळ साप चावून मेलेल्या आश्रम शाळेतील आश्रमशाळेतील जीवांची संख्या 40 च्या घरात असून, ज्या ठिकाणी शौचालय नाही तेथे विद्यार्थ्यांना नदीवर अंघोळीला जावे लागत असणे, आणि मुलांचा पाण्यामध्ये बुडून मृत्यू होत असणे, याची जबाबदारी शासनाने घेण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |
| (९) | ५१०० | १० | "देशामध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होत असताना पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील सावर्डे येथे दोन बालकांच्या झालेल्या मृत्यूने राज्यातील कुपोषणाचा प्रश्न पुन्हा प्रकर्षाने समोर आलेला असणे, आरोग्य विभागाच्या आकडेवारीवरून डिसेंबर अखेरपर्यंत जिल्ह्यात 2427 कुपोषित बालकांची नोंद झालेली असणे, त्यामुळे राज्यातील आदिवासी भागातील वाढत्या उपोषणाच्या बाबतीत शासनाने कुपोषण मुक्तीच्या संदर्भात मुलांचे, गर्भवतीचे वजन, आरोग्याबाबत द्यावयाची काळजी इत्यादी माध्यमातून पौष्टिक आहार, कच्चे कडधान्य यासाठी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याची आवश्यकता याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (१०) | ५१०६ | १०० | समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या आदिवासी मुलांना शिक्षणासह जगण्याचा आधार मिळावा या उद्देशाने सुरु झालेल्या शासकीय आश्रमशाळांमधील सन 2017 ते 2022 या कालावधीत 680 मुलांचा गेल्या जवळपास साडेपाच वर्षांमध्ये मृत्यू झाल्याचे व यापैकी 282 मुलांचे मृत्यू हे विविध आजरांमुळे झाले असल्याचे निदर्शनास येणे, यापैकी ठाणे, नाशिक व नागपूर व अमरावती या विभागांतर्गत असलेल्या आश्रमशाळांमधून झालेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूंपैकी सर्वाधिक मृत्यू हे नाशिकमधील आश्रमशाळांमध्ये झाले असल्याचे निदर्शनास येणे, शासन स्तरावर याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन मृत्यू संख्या रोखण्याबाबत करावयाच्या उपाययोजना |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (११) | ५०२० | १० | दि. ५ जानेवारी २०२३ रोजी पेठरोड (नाशिक) येथील एकलव्य इंग्रजी शाळेतील निवासी वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या जेवणात अळया निघाल्याचे उघडकीस आलेले असणे, दि. ६ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी सतत निकृष्ट दर्जाच्या भोजनाचा पुरवठा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | होत असल्याचा आरोप करीत वसतिगृहात ठिय्या मांडून अन्नत्याग आंदोलन केलेले असणे,या विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी आदिवासी विकास विभागाने सेंट्रल किचन संस्थेकडे काम दिलेले असणे, त्यांच्याकडून पुरवठा होत असलेले अन्न निकृष्ट दर्जाचे असल्याची विद्यार्थ्यांकडून वारंवार तक्रार केली जाणे, मात्र या तक्रारीकडे दुर्लक्ष करून टाळाटाळ केली जात असणे,सतत निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत असल्याने त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केलेले असणे, सदर प्रकरणी संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार भोजन मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ५०२१ | १० | मुंबई मधील मुलुंड येथील स.न. ३०५ पैकी क्षेत्र २-३५-० आर ५.२५ या मिळकतीचा ताबा दि. १.४.१९५७ पूर्वीपासून आदिवासी व्यक्तींकडे असणे, महसूल अधिकार अभिलेखांमध्ये संरक्षित कुळ म्हणून आदिवासींची नोंद असतांनाही माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये बिगर आदिवासी धनधांगडया लोकांनी गुंडांकरवी या मिळकतीचा ताबा घेण्याचा प्रयत्न केलेला असणे, आदिवासींची जमिनी बिगर आदिवासी धनधांगडयांकडून बळकवण्यासाठी गुंडांकडून येथील आदिवासी रहिवाशांना मारहाण करणे व धमक्या दिल्या जात असणे,त्यामुळे कुळवहीवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे तरतुदींचे तसेच महाराष्ट्र अनुसूचित जमातींच्या जमिनी प्रत्यार्पित करण्याचा अधिनियम १९७४ कलम ३ व ४ मधील तरतुदींचे उल्लंघन झालेले असणे,सदर आदिवासी नागरिकांना पोलीस स्टेशन आणि शासकीय यंत्रणांकडून मदत केली जात नसणे, गरीब आदिवासी नागरिकांची जमीन बळजबरीने हडप केली जात असणे, या अन्यायामुळे आदिवासी समाजातील नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ५०२२ | १० | इगतपुरी तालुक्यातील मौजे भावली खुर्द जि.नाशिक येथील स.नं. १८१,१८२ क्षेत्र सुमारे ४.४ हेक्टर आर येथील मिळकत बळजबरी फसवणूक करून आदिवासी इसमांच्या जमिनीच्या हक्कांचे अवैध पद्धतीने हस्तांतरण करण्यात आल्याबाबत बिरसा ब्रिगेड आदिवासी बचाओ आंदोलन या सामाजिक संस्थेने दि. २ डिसेंबर २०२१ रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे तक्रार केलेली असणे,मौजे भावली खुर्द स. नं. ७२३ ,८९/४ ४३८ मौजे जामुंडे ७४ अ, ७४ ब, ७४ क व ७४ ड आणि मौजे गावंडे स. नं. ३५/ब,मौजे चिंचलेखैर स. नं. १८९ मौजे वाघ्याची वाडी स. नं. १०,२४ व २०४,मौजे पिंप्रीसदो स. नं. ४०६ मौजे तळेगाव स.नं. ३७१ व ३९८,मौजे बालविहीर स.नं. १अ,१ब,५७८ , ६३०,५९ एए , ५९६ ब, ५५३ व ५७५ मौजे गव्हांडे १०७,११८,१३०,६७,१६५ व ४४ या आदिवासी इसमांच्या जमिनींचे सुद्धा बळजबरीने गैरमार्गांचा अवलंब करून बिगर आदिवासी धनदांडग्या मंडळींनी हस्तांतरण केलेले असणे, या जमिनींचे हस्तांतरण |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करतांना कायदेशीर वारसांना फसवणुकीने वगळण्यात आलेले असणे, कायदेशीर वारसांच्या संमतीशिवाय या जमिनींचे खरेदी-विक्री व्यवहार करण्यात आलेले असणे, सदर जमिनींचे आदिवासींकडून बिगर आदिवासी व्यक्तींना विकण्यासाठी योग्य प्राधिकरणाकरून परवानगी घेण्यात आलेली नसणे,या खरेदीदारांनी शंभर एकरपेक्षा जास्त आदिवासी जमिनींची गैरमार्गाने आणि फसवणूक करून ताबा घेतल्याबाबत तक्रार असणे, या गरीब आदिवासी नागरिकांची फसवणूक करून आदिवासींच्या शेकडो एकर जमिनी लाटण्यात आलेल्या असणे, सदर आदिवासी नागरिकांना धमकवण्यात येत असल्याने त्यांच्यामध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले असणे, या जमिनींच्या गैरव्यवहारामध्ये शासकीय यंत्रणांकडून आदिवासी नागरिकांना मदत होत नसल्याचा आरोप असल्यामुळे संशय निर्माण झालेला असणे, आदिवासी नागरिकांच्या जमिनी बळजबरी,फसवणूक करून हडप करण्याबाबतच्या या प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, मात्र याबाबत दिरंगाई व टाळाटाळ केली जात असल्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ५०२३ | १० | पिंप्री सद्दोद्दीन ता. इगतपुरी जि.नाशिक येथील आदिवासी विकास विभागाच्या क्रीडा प्रबोधिनीचे काम सुरु करण्यासाठी दिरंगाई केली जात असणे, पिंप्री सद्दोद्दीन येथील गट नं. २८९, २८२, २८५,२८९ एकूण क्षेत्र २१.०८ हे. आर पैकी १८.७३ या क्षेत्रावर आदिवासी विकास विभागाची क्रीडा प्रबोधिनीचे काम करणेसाठी सुधारित अंदाजपत्रकासह शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबत दि. २४ एप्रिल २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे झालेल्या बैठकीत शासनाने निर्णय घेतलेला असणे, आदिवासी विकास विभागाच्या सदर क्रीडा प्रबोधिनीचे काम सुरु करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपयायोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१५) | ५०३९ | १० | राज्यात नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संशोधनाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. त्यासाठी शैक्षणिक पात्रतेमध्येही बदल करण्यात आला असणे, त्यामुळे अनेक संस्था त्या-त्या समाजातील विद्यार्थ्यांचा संशोधनाचा टक्का वाढवण्यावर भर देत असून यासाठी अनेक योजनाही सुरू करण्यात आलेल्या असणे, मात्र आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या पदरी निराशाच आलेली असणे, राज्यातील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचे संशोधनामध्ये येण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याने हे प्रमाण वाढवण्यासाठी आणि या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना संधी मिळावी म्हणून 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थे'ने अधिछात्रवृत्ती योजना सुरू करावी, अशी मागणी अनेक वर्षांपासून सुरू असूनही वित्त विभागाच्या अडथळयांमुळे अधिछात्रवृत्तीचा प्रश्न प्रलंबित असणे, परिणामी पीएचडी करून विचारणाऱ्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून बार्टी, सारथी व महाज्योती या तिन्ही संस्थांच्या धर्तीवर आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (१६) | ५११७ | १० | अमरावती जिल्ह्यात मेळघाट हा १०० % आदिवासी बहुल भाग असणे , तसेच अमरावती जिल्ह्यात मेळघाट वगळता मोठ्या प्रमाणात आदिवासी समाजाची संख्या असणे , मेळघाट वगळता जिल्ह्यातील १००% आदिवासीच्या प्रमाणात ५०% टक्के आदिवासीची संख्या दर्यापूर मतदारसंघात असणे , राज्य शासनामार्फत दर्यापूर तालुक्यातील सागरवाडी मिनी म्हाडा पॉकेट केंद्र शासनाकडे प्रस्तावित असणे , परंतु सदर मिनी म्हाडा पॉकेट ला अद्यापही मान्यता मिळालेली नसणे , सागरवाडी मिनी म्हाडा पॉकेट अंतर्गत येत असलेल्या गावांमध्ये मूलभूत सुविधा निर्माण होण्याच्या दृष्टीने यास केंद्र शासनाची मान्यता मिळण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत केंद्र शासनास शिफारस करण्याबाबत करावयाचे कार्यवाही व उपाययोजना |
| (१७) | ५१२७ | १० | दर्यापूर मतदारसंघात मोठ्या प्रमाणात आदिवासींची संख्या जास्त असून येथील आदिवासी वस्त्या पाड्यावर मोठ्या प्रमाणात मूलभूत सुविधांचा अभाव असणे , दर्यापूर अंजनगाव सुर्जी आणि अचलपूर तालुक्यातील वस्त्या पाड्यांचा विकास करण्यासाठी तसेच येथे मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची नितांत आवश्यकता असणे , दर्यापूर मतदारसंघातील आदिवासी वस्त्या पाड्यांच्या विकासासाठी २० कोटी निधीची आवश्यकता असणे , ठक्कर बाप्पा आदिवासी योजनेअंतर्गत आदिवासी वस्त्या पाड्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१८) | ५०७५ | १० | "राज्यात ॲट्रॉसिटी खाली चालणाऱ्या सर्व प्रकरणाचे तसेच खटल्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे, दि.16 जानेवारी 2016 पासून अनिवार्य केले असून मात्र आजतागायत मुंबई उच्च न्यायालय आणि अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विशेष न्यायालय, मुंबई येथे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, त्यामुळे सदर खटल्यांमध्ये पारदर्शक न राहता त्यामधील दोष सिद्धतेचे प्रमाण अतिशय कमी झालेले असल्याचे आढळून येणे, जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हाधिकारी, मुंबई यांची तशी व्हिडिओ रेकॉर्डिंग व्यवस्था करण्याची जबाबदारी असून त्यांना सन 2018 पासून सतत मागणी व विनंती करुनही व्यवस्था करण्यात केली जात नसणे, त्यामुळे एकूण न्यायव्यवस्थेबाबत निर्माण झालेली संशयाची भावना तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वर्गात पसरलेली |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तीव्र असंतोषाची भावना, ही अतिशय गंभीर बाब असून याबाबत राज्य शासनाने चौकशी करून मुंबई उच्च न्यायालयाल व अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विशेष न्यायालय, मुंबई ॲट्रॉसिटी संदर्भातील खटल्याचे व्हिडिओ रेकॉर्डींग करण्याबाबत त्वरित आदेश देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. “ |
| | | | **श्री. रईस शेख** |
| (१९) | ५०६७ | १०० | तालुका वाडा (जि. पालघर) येथील गुहीर या गावातील केतन जाधव यांच्या घरापासून ते दशरथ गायकर यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करण्याचे प्रस्तावित केले आहे. येथील शेतकऱ्यांच्या दृष्टीने सदर रस्ता तयार होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ३,७०,००,०१,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (२०) | ५०४८ | १० | जळगाव जिल्ह्यातील रावेर मतदारसंघातील आदिवासी भागातील रस्त्यांची खूप दयनीय अवस्था झालेली असून फैजपूर ता. यावल येथे आदिवासी मुला मुलींचे वसतीगृह बांधकाम करण्याची आवश्यकता असून याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ५०४९ | १० | जळगाव जिल्ह्यातील रावेर मतदारसंघातील आदिवासी भागातील रस्त्यांची खूप दयनीय अवस्था झालेली असूनपाल ता. रावेर येथे आदिवासींसाठी सांस्कृतिक भवन बांधकाम करणे आवश्यक असताना याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत करावयाची उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (२२) | ५०८८ | १० | जि. पुणे येथील किल्ले पुरंदरच्या पायथ्याशी अनेक वर्षापासून मोठ्या प्रमाणावर महोदव कोळी समाजाची लोकवस्तीची असून यामध्ये चिव्हेवाडी, मिसाळवाडी, घेरापुरंदर, बहिरवाडी, पूर, पानवडी ही गावे आहेत. संबंधित गावामध्ये ४० टक्क्यापेक्षा जास्त महोदव कोळी समाज राहत असून महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभाग शासन परिपत्रक क्र.अजाऊ२००९/प्र/क्र. ६१/का-१४१३ दिनांक २१ मे २०१० नुसार अनु. जमातीच्या ४० टक्के व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेली गावे / वस्त्या अनु. जमाती उपयोजना क्षेत्र म्हणून संबोधण्यात येऊन त्यांना विशेष लाभ देण्याचे प्रयोजन आहे. परंतु पुरंदर तालुक्यातील संबंधित गावे/वस्त्या यांना आदिवासी क्षेत्राचा दर्जा जाहिर करण्याबाबत करावयाची कार्यवाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३६, पोषण आहार**<br>**रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२३) | ५११४ | १० | पालघर जिल्हयातील जव्हार व मोखाडयातील या आदिवासी भागातील लहान मुलाचे कुपोषण होत असणे, सर्व्हेक्षणात सुमारे ९२ मुले, कुपोषित झाल्याचे आढळून आले असणे, सुदृढ आरोग्यासाठी कोटयावधीचा निधी खर्च होत असणे, प्रशासानाच्या दुर्लक्षामुळे कुपोषणाचा विळखा पडला असणे, संबंधिंत अधिकारी दुर्लक्ष करीत असणे, संबंधित अधिकाऱ्यांची विभागीयय चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, कर्तव्यात कसून केल्याप्रकरणी अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची गरज निर्माण झाली असणे, याकउे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्षं, परिणामी आदिवासी बांधवात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (२४) | ५१२८ | १० | राज्यातील नंदुरबार जिल्हयात मोठया प्रमाणावर आदिवासी बालक कुपोषित रहात असणे, आदिवासी बालीकांना आरोग्य सेवा मिळत नसणे, वैद्यकीय सोयीसुविधा अभावी ४११ जणांचा मृत्यू झाला असणे, तसेच ८६ बालकाचा समावेश असणे, आदिवासी बालीकांची हेळसांड होत असणे, कुपोषण रोखण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक आदिवासी बांधवात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५०५, ग्रामीण रोजगार**<br>**रूपये:- १५,७१,००,०१,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२५) | ५०६३ | १० | केंद्र व राज्य सरकारने महात्मा गांधी रोजगार हमी योजना कार्यान्वित करून 'मागेल त्याला काम व 15 दिवसांत दाम' अशी तरतूद करण्यात येऊनही पालघर जिल्ह्यातील डोंगराळ आदिवासी भागातील जव्हार, मोखाडा अतिदुर्गम तालुके आजही विकास कामापासून वंचित असणे, पालघर जिल्ह्यातील डोंगराळ भागातील जव्हार, मोखाडा अतिदुर्गम लोकवस्तीत 95 टक्के आदिवासी कुटुंबे राहत असणे, येथील आदिवासी क्षेत्रातील स्थानिक मजूरांना गावात काम नसल्याने रोजगार देणे गरजेचे असताना बेरोजगारीमुळे बेकार भत्ता देण्यात न आल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी आल्याने आदिवासींमध्ये तीव्र असंतोष व संतापाची भावना निर्माण होणे, पालघर जिल्ह्याच्या परिसरातील तसेच पंचक्रोशीतील आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांच्या गरजा भागवण्यासाठी प्रशासनाने सर्वोतोपरी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ग्रामीण भागामध्ये लवकरात लवकर गावातील गोर-गरिबांना रोजगाराची कामे सुरू करण्याबाबत शासनाने योग्य त्या तातडीच्या उपाययोजना करण्याची आवश्यकता. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (२६) | ५०७२ | १०० | पालघर जिल्ह्यातून मुंबई - बडोदा सुपर फास्ट हायवे च्या कामासाठी जमीन भूसंपादन सुरु असणे, पालघर हा आदिवासी बहुल जिल्हा असणे, ज्या जमिनी भूसंपादन झालेल्या आहेत त्या अधिकतर आदिवासी शेतकरी बांधवांच्या असणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे सदरहू प्रकल्पात जमीन घोटाळा होणे, मोठ्या प्रमाणावर आदिवासी शेतकऱ्यांची फसवणूक होणे, अधिग्रहित जमिनीचा मोबदला शासनाकडून मिळत असतानाही त्यात दलाल डल्ला मारत असणे, जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध असणे, बहुमोल वनसंपत्ती नष्ट होणे, पर्यावरण प्रेमींनी आक्षेप घेणे, पालघर जिल्ह्यातील वसई, वाडा, पालघर विशेषतः तलासरी, डहाणू या तालुक्यातून सदरहू हायवे जाणार असणे, सर्वच शेतकऱ्यांनी त्यास जमीन देण्यास विरोध करणे, ज्या ठिकाणी जमीन मोजणी पूर्ण झालेली आहे, त्या ठिकाणी मोबदला अतिशय तुटपुंज्या असणे, त्यास ही शेतकऱ्यांचा विरोध असणे, प्रस्तावित मुंबई - बडोदा महामार्गामुळे पालघर जिल्ह्यातील वनसंपत्तीची मोठी हानी होणार असणे, वसई ते तलासरी पर्यंतची सुमारे १८१ हेक्टर वनजमीन या महामार्गासाठी जाणार असणे, शिवाय सुमारे ५१ गावांतील शेतकरी बाधित होणार असणे, या सर्व घटनांमुळे नागरिकांमध्ये पसरलेल्या तीव्र असंतोष लक्षात घेऊन शासनाने याची गंभीर दखल घेऊन बाधित शेतकऱ्यांना तत्काळ मोबदला देण्याच्या अनुषंगाने करावयची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १०,००,००,०१,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२७) | ५०७७ | १० | चंद्रपूर जिल्हयात ब्रम्हपुरी, सिंदेवाही व सावली तालूक्याचा समावेश असणे, या तीनही तालुक्यातील आदिवासी परिसरातील रस्ते व पुल नादुरुस्त व रहदारीस अयोग्य असल्याने वारंवार अपघात होणे, या कारणास्तव आदिवासी विभागाने माहे जानेवारी २०२१ पासून तर जुलै २०२२ पर्यत झालेल्या अधिवेशनातील अर्थसंकल्प, पुरवणी मागण्यामध्ये पुल/रस्ते दुरूस्ती व नवीन पुल/रस्त्यांच्या कामांना निधीसह प्रशासकीय मान्यता देऊन मंजूर करणे, मंजूर असलेल्या या सर्व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कामाची निविदा प्रक्रिया अंतिम ठप्पात असतांना तर काही कामांना तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया सुरू करणे बाकी असतांना राज्य शासनाच्या आदेशानुसार आदिवासी विभागाने दिंनाक २६ जुलै २०२२ रोजी परिपत्रक काढून १ एप्रिल २०२१ पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा सर्व कामांना स्थगिती देण्यात येत असल्याचे सर्व विभागाला कळविणे, त्यामूळे या दोनही तालुक्यातील दळणवळणाचे मुख्य साधन असलेल्या पुल/रस्त्यांच्या कामांना स्थगिती देण्यात येणे, स्थगितीमुळे पुल/रस्त्यांची कामे ठप्प झालेली असल्यामूळे रस्ते व पूल अत्यंत खराब झालेली असलयामूळे वारंवार अपघात होऊन निरपराध लोकांचा बळी जात असल्यामूळे याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामूळे नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामूळे राज्य शासनाने गेल्या ऑगस्ट २०२२ पासून तर २ डिसेंबर २०२२ च्या दरम्यान राज्यातील अनेक जिल्हयातील पुलांच्या/रस्त्यांच्या कामावरील दिलेली स्थगिती उठवून कामे पुर्ववत सुरू करण्याचे आदेश दिले आहे त्याच धर्तीवर चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालुक्यातील पुल/रस्त्यांच्या सर्व कामांना दिलेली स्थगिती उठवून ही सर्व कामे पुर्ववत सुरू करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (२८) | ५०९५ | १० | चंद्रपूर जिल्हयात ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालूक्याचा समावेश असणे, या तीनही तालुक्यातील आदिवासी परिसरातील रस्ते व पुल नादुरुस्त व रहदारीस अयोग्य असल्याने वारंवार अपघात होणे, त्यामुळे अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी आदिवासी परिसरातील रस्ते व पुलाचे कामे अर्थसंकल्प २०२३ च्या आदिवासी विभागाच्या बजेटमध्ये मंजूर होण्यासाठी अप्पर मुख्य सचिव आदिवासी विकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे प्रस्ताव पाठविणे, त्यात चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील वाकल ते जामसाळा रस्ता ग्रामा 56 की मी 0/0 ते 2/400 मध्ये मजबुतीकरणासह सुधारणा करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यातील रामा 375 ते उसरपार तुकुम मगरमेंढा रस्ता रस्ता ग्रामा 109 की मी 0/0 ते 3/600 मध्ये मजबुतीकरणासह सुधारणा करणे,चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील नाचनभट्टी ते प्रजिमा- 116 रस्ता ग्रामा-50 कि.मी. 1/200 वर लहान पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील टेकरी प्रजिमा-30 ते कन्हाळगाव रस्ता ग्रामा-29 कि.मी. 1/800 ते 2/0 मध्ये रस्ता संरक्षणासह सुधारणा करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यातील प्रजीमा 117 ते सादागड जोड रस्ता ग्रा मा 36 की मी 0/0 ते 2/500 मध्ये मजबुतीकरणासह सुधारणा करणे या कामाचा समावेश असणे, मात्र यातील एकाही कामांना अर्थसंकल्पातील आदिवासी विभागाच्या बजेटमध्ये मंजूरी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मिळालेली नसणे, त्यामुळे रहदारीस अयोग्य असलेल्या या रस्त्यांची कामे आता होणार नाही अशी भावना नागरिकात पसरलेली असल्याने नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी आदिवासी परिसरातील बांधवांना रहदारीसाठी बारमाही रस्ते उपलब्ध होण्यासाठी प्रस्तावित केलेल्या कामांना निधीसह प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १५ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) आदिवासी विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई